१-ब

# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/१२६

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

क्र.२/२०२२-२३

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील ३० ऑगस्ट, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार **दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली.

**स्वागत :-** सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु.क्र. | मा. सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य | उपस्थित |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य | उपस्थित |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य | उपस्थित |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य | उपस्थित |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य | उपस्थित |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य | उपस्थित |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य | उपस्थित |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य | उपस्थित |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य | उपस्थित |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य | उपस्थित |
| १४. | डॉ. बी.एन. जगताप | सदस्य | अनुपस्थित |
| १५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १८. | श्री. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| १९. | डॉ. विनोद पाटील<br>(संचालक,प. व मु. मं.) (प्र.कुलसचिव) | सदस्य सचिव<br>/निमंत्रित | उपस्थित |
| २०. | डॉ. प्रदीप कामथेकर<br>(वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |

➢ **श्रध्दांजली :-**

**श्री. प्रभाकर संत**

शैक्षणिक, सामाजिक समस्यांना मार्गी लावणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक ज्येष्ठ कार्यकर्ता आणि माजी शिक्षक आमदार श्री. प्रभाकर संत यांचे दिर्घ आजाराने दिनांक २९ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षाचे होते.

| **बाब क्र.** | **व्यवस्थापन परिषदेची बाब** | **विभाग** |
|---|---|---|
| १ | दि. २४ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | दि. २४ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर | मा.सं. विकास कक्ष |
| ठराव | दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात आले त्यातील बाब क्र.१० नुसार मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयानुसार मुंबई विद्यापीठातील सध्या कार्यरत असलेल्या (court case) मधील हंगामी कर्मचार्यांना minimum pay scale लागू करण्याबाबतची बाब वित्त व लेख समितीत विचाराधीन ठेव्यात आली होती.<br><br>वित्त व लेखा अधिकार्‍यांनी विद्यापीठ फंडावर किती अतिरिक्त भार पडणार आहे याची माहिती दिली. याबाबीवर व्यवस्थापन परिषदे मध्ये सखोल चर्चा करण्यात आली व सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत सिनियर कोन्सील यांच्या कडून कायदेशीर सल्ला घेण्यात यावा व त्याप्रमाणे पुढे सर्वोच्च न्यायालयाचा बाजू मांडावी. तसेच कर्मचाऱ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अंतरिम | |

| | | |
|---|---|---|
| | बाब म्हणून शासनाच्या वेतन श्रेणीनुसार ऑगस्ट पेड इन सप्टेंबर मध्ये minimum pay scale प्रमाणे बेसिक वेतन देण्यात यावे व जुलै महिन्यातील फरक सुद्धा देण्यात यावा. याप्रमाणे पुढील आदेश येईपर्यंत कामावर हजर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दरमहा वेतन न्यायालयीन प्रक्रियेच्या अधिन राहून व कोणताही पूर्वग्रह न ठेवता करण्यात यावे.<br><br>यामुळे विद्यापीठ फंडावर पडणार अतिरिक्त भार हा खूप प्रमाणात पडणार आहे यासाठी महाराष्ट्र शासनाकडे याबाबतीत सविस्तर निवेदन देऊन मदत मागावी असे ठरले.<br><br>त्याप्रमाणे दिनांक ३० ऑगस्ट रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या इतर बाबी सर्वानुमते मंजूर करण्यात आल्या. | |

| चर्चेच्या अनुषंगाने येणारे विषय | |
|---|---|
| २ | शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व विविध संघटनेच्या मागण्याबाबत चर्चा करण्यासाठी ॲड. निल हेळेकर यांच्या अध्यक्षते खाली नियुक्ती केलेला "कोर कमिटीचा" अंतिम अहवाल स्विकारणेबाबत |
| ठराव | ॲड. निल हेळेकर यांनी काही सूचनां "कोर कमिटीचा" अंतिम अहवाल व्यवस्थापन परिषदे समोर सादर केला. सदर अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

व्यवस्थापन परिषदेची ही शेवटची सभा असल्यामुळे मा. कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेच्या सहकार्या बद्दल आभार मानले व चार वर्षाच्या कार्यकाळातील उल्लेखनीय बाबी मांडल्या.

श्री. दिपक मुकादम यांनी सुद्धा व्यवस्थापन परिषदेच्या कार्यकाळातील सहकार्या बद्दल व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानले.

तसेच मा. कुलसचिव यांनी मा.कुलगुरू, प्र.कुलगुरू व सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानले.

कुलसचिव (प्र.)

प्र-कुलगुरू

मा. कुलगुरू